देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

**(विधी व न्याय विभाग अंतर्गत)**

२४०२ "ए " वॉर्ड, अपना बँक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर
फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५० फॅक्स: (०२३१) २६२६७५०
E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com

**क्र.देव.वशि.जा. १२९०/२०२४**

**दिनांक :** 24 JUL 2024

**विषय :** श्री.करवीर निवासिनी देवस्थानकडील शारदीय नवरात्र उत्सव २०२४ मध्ये बॅन्ड पुरविणे बाबत.

श्री.करवीर निवासिनी देवस्थानकडील शारदीय नवरात्र उत्सव दिनांक ०३/१०/२०२४ ते दि.१२/१०/२०२४ अखेर संपन्न होणार आहे. सदर धार्मिक कार्यक्रमाचेवेळी **"श्री.करवीर निवासिनी महालक्ष्मी/अंबाबाई देवीची"** पालखी सोबत खाली नमुद केले दिवशी बॅन्ड १० लोक ड्रेसकोडसह पुरविणेकामी दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| क्र. | दिनांक | उत्सवाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | दि. ०८/१०/२०२४ | ललित पंचमी |
| २ | दि. ११/१०/२०२४ | आष्टमी |
| ३ | दि. १२/१०/२०२४ | दसरा |

१) सदरचे दरपत्रक या कार्यालयाकडे दि. १२ /०८/२०२४ अखेर सायंकाळी ५.०० वा पर्यत जमा करणेचे आहे, त्यानंतर येणारे दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२) दरपत्रक देणा-या व्यक्तीने आपले संपूर्ण नाव पत्ता, भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक स्पष्टपणे लखोटयावर लिहावा.

३) दरपत्रकासोबत पॅनकार्ड व आधारकार्डची प्रत जोडणे आवश्यक आहे.

४) वरील उत्सव हा तिथीनुसार होत असलेने, ललित पंचमी, आष्टमी व दसरा हे उत्सवास बॅन्ड वाजविणेची सेवा करणेची आहे, दिनांकामध्ये बदल होऊ शकतो.

५) कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा स्थगित ठेवणेचा अधिकार प्रशासक देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर हे घेतील ते राखून ठेवला आहे, त्यासाठी कोणतेही तोंडी अथवा लेखी कारण दिले जाणार नाही.

सचिव
**देवस्थान व्यवस्थापन समिती**
**पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर**

**प्रत :**

१) कार्यालयीन वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

२) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर मुख्य कार्यालय नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी.

३) श्री.करवीर निवासिनी महालक्ष्मी/अंबाबाई देवस्थानचे नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी.

४) श्री.केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी ता.पन्हाळा येथील नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी.

५) श्री.सिध्दीविनायक ओढयावरील गणपती, श्री.दत्तभिंक्षालिंग देवस्थान आझाद चौक, श्री.बिनखांबी गणेश मंदिर महाद्वार रोड, श्री.पंचमुखी मारुती देवस्थान बागल चौक, श्री.बाळूमामा देवस्थान शाहुपुरी १ ली गल्ली या स्थानिक देवस्थानकडे प्रसिध्दीसाठी.

Scanned with OKEN Scanner